# इयत्ता – सातवी – पाठ्यक्रम

विद्यार्थ्यांनी स्वप्रयत्नांतून पुढील **उद्दिष्टे** साध्य करावीत यासाठी चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे–

१. सार्वजनिक ठिकाणी दिलेल्या श्राव्य व लिखित सूचना आणि संदेश समजणे.

२. गाणी व कवितांमधील आशय आणि कवीने केलेल्या कल्पना सांगणे.

३. एका मिनिटाला सुमारे ४० शब्द या गतीने समजपूर्वक मूकवाचन करण्याचा सराव करणे.

४. पाठ्य व पुरवणी वाचनसाहित्यांतील कथांमधील आणि नाटकांतील घटनांचा क्रम व त्यामागील कारणे सांगणे.

५. अन्य व्यक्तींच्या जीवनातील अनुभव समजून घेणे.

६. अचूक, स्पष्ट शब्दोच्चार, तसेच विरामचिन्हे लक्षात घेऊन प्रकट वाचन करणे.

७. परिचित मजकुराचे अनुलेखन आणि श्रुतलेखन करणे.

८. स्वतःचे अनुभव, कल्पना किंवा विचार चार ते सहा वाक्यांत लिहिणे.

९. नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद या शब्दांच्या जातींची वैशिष्ट्ये ओळखून त्यांचा उपयोग करणे.

१०. आवडलेली कथा, कविता, विनोद साभिनय सादर करणे.

११. सुमारे ११०० शब्दांची श्रवण शब्दसंपत्ती व सुमारे ४५० शब्दांची भाषण शब्दसंपत्ती व १२० शब्दांची वाचन शब्दसंपत्ती विकसित करणे.

१२. सातत्याने नवीन शब्द गोळा करणे आणि त्यांची अर्थासह 'आमचा शब्दसंग्रह' विकसित करण्यासाठी नोंद करणे.

१३. अन्य भाषांबद्दल आदर बाळगणे.

# इयत्ता ७ वी – पाठ्यक्रम

## अध्ययनक्षेत्र – वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| सूचना (श्राव्य व लिखित) | शाळेत, क्षेत्रभेटीच्या वेळी आवश्यक असणाऱ्या सूचना वेळोवेळी देणे. त्यांचे पालन न करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे. सार्वजनिक ठिकाणी असणाऱ्या लिखित सूचनांकडे लक्ष वेधणे. त्या वाचायला सांगणे. अर्थबोध होण्यास मदत करणे. परिसरात वाचलेल्या नवीन सूचना विचारणे. | सूचना लक्षपूर्वक ऐकणे. अर्थ समजून कृती करणे. सूचनांचा अर्थ न समजल्यास मित्रांना/शिक्षकांना मराठीतून अर्थ विचारणे. लिखित सूचना वाचून त्यानुसार स्वतः कृती करणे व इतरांना प्रवृत्त करणे. | श्राव्य व लिखित सूचना समजते. | जबाबदारी समजते. | सूचना पाळतात. प्रसंगानुरूप सूचना तयार करतात. | निरीक्षण |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| गप्पा, संभाषण | क्षेत्रभेटीच्या वेळी शाळेत व घरी आलेल्या अनुभवांवर आधारित गप्पा मारण्यास सांगणे. | मित्र व अन्य व्यक्तींबरोबर व्यवहार करताना आलेल्या अनुभवांची देवाणघेवाण करणे. प्रश्न विचारणे, उत्तरे देणे. नवनवीन शब्द आत्मसात करणे. | योग्य शब्दांची, वाक्यांची रचना करतात. नवीन शब्दांचा अर्थ समजतात. | इतरांचे अनुभव समजून घेण्याने जवळीक वाढते, याची अनुभूती घेतात. | नवीन परिचय झालेल्या शब्दांचा वापर आवर्जून करतात. | तोंडी काम (संभाषण) |
| भाषण | विद्यार्थ्यांना आवडता विषय विचारणे. त्यावर काय बोलायला आवडेल ते विचारणे. त्यासाठी आवश्यक ती मदत करणे. गटात व वर्गासमोर भाषण करण्यास सांगणे. | स्वतःचा आवडता विषय सांगणे. आशयाची निश्चिती करणे. शब्द, वाक्य व उच्चारण या बाबतीत आलेल्या अडचणी शिक्षकांना विचारणे. सलग परिच्छेद तयार करणे. गटात व वर्गासमोर भाषण देणे. | विषय सलग व मुद्देसूद मांडता येतो. | आत्मविश्वास वाढतो. | विशेष दिन, राष्ट्रीय दिन यांसारख्या प्रसंगी भाषणांच्या उपक्रमात भाग घेतात. | तोंडी काम (भाषण) उपक्रम |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| घटनाक्रम | पाठ्य व पुरवणी वाचन,साहित्यातील कथा, नाटक यांचे सादरीकरण झाल्यावर त्यातील घटनाक्रम दर्शविणारी वाक्यांची कार्डे तयार करून ती गटात वाटणे. त्यांचा क्रम लावण्यास सांगणे. कथा, नाटक यात 'असेच का घडले' यामागील कारणे विचारणे. आणखी काय घडू शकेल ते विचारणे. | कथा, नाटक यांचे सादरीकरण लक्षपूर्वक ऐकणे. गटातील वाक्यकार्डांचे वाचन करणे, क्रम लावणे, सलग वाचन करणे. कारणे शोधण्यासाठी अंदाज करणे. | कथानक समजतात. | क्रम लावण्यात आनंद घेतात. | घटनाक्रम लक्षात घेऊन वाचन करतात. | वर्गकार्य, स्वाध्याय |
| आशय व कल्पना | गाणी व कविता ऐकविणे. वाचायला देणे. त्यातील आशय व कल्पना | गाणी व कविता वाचून आवडलेली कल्पना सांगणे. प्रश्नांची उत्तरे | स्व-शब्दांत आपले विचार मांडतात. | कविता समजून घेण्याचा आनंद घेतात. | कविता वाचन स्पर्धेत भाग घेतात. | तोंडी काम (कल्पना कथन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | यांवर आधारित छोटे प्रश्न व आवडलेल्या कल्पना विचारणे. | देणे. मित्रांना प्रश्न विचारून त्यांना आवडलेल्या कल्पना विचारणे. | | | | |
| प्रकट वाचन | विद्यार्थ्यांना आवडतील अशा वाचन साहित्याची निवड करणे. गटात कथा, संवाद, कविता, नाटुकले इ. साहित्यप्रकार देऊन त्यांचे प्रकट वाचन कसे करायचे त्याची प्रात्यक्षिके घेणे. | शिक्षकांच्या प्रात्यक्षिकांचे निरीक्षण करणे. उच्चारण, विरामचिन्हे, आरोह–अवरोह यांच्या वापराबाबत शंका विचारणे. वर्गासमोर प्रकट वाचन करणे. | साहित्य प्रकारानुसार प्रकट वाचन कसे करायचे ते समजते. | समजून काम केल्याचा आनंद घेतात. | वर्गात प्रकट वाचनाच्या उपक्रमात भाग घेतात. घरी प्रात्यक्षिके दाखवितात. | तोंडी काम (प्रकटवाचन) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, शिक्षक, मित्र) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| सादरीकरण | पाच–पाच विद्यार्थ्यांचा गट करणे. विद्यार्थ्यांना आवडलेल्या साहित्याच्या निवडीस मदत करणे. सादरीकरणाची कल्पना सोदाहरण स्पष्ट करणे. विद्यार्थ्यांना स्वतःच्या शैलीत सादरीकरणास प्रोत्साहन देणे. | चर्चा करून कथा, कविता, विनोद इ. साहित्याची निवड करणे. सादरीकरणातील भूमिका समजावून घेणे. गटाने तयारी करून वर्गासमोर साभिनय सादर करणे. | सादरीकरण कसे करायचे ते समजते. | करून पाहिल्याचा आनंद घेतात. | वर्गातील सादरीकरणाच्या उपक्रमात सहभागी होतात. घरी प्रात्यक्षिके दाखवितात. | तोंडी काम (सादरीकरण) |